
राज कपूर स्पीक्स: लाडक्या लेकीची पित्याला श्रद्धांजली



***शो**मन पित्याच्या आयुष्यातल्या अनेक खासगी गोष्टी त्यांची कन्या या ठिकाणी प्रामाणिकपणे नमूद करतेय...*

केवळ राज कपूरच्या चाहत्यांनाच नव्हे तर सर्वसामान्य वाचकांनाही आवडेल असं 'राज कपूर स्पीक्स' नावाचं पुस्तक नुकतंच बाजारात आलंय.

राज कपूरला जवळून ओळखणाऱ्यांनाही कदाचित ठाऊक नसतील अशा अनेक गोष्टी या पुस्तकात आहेत. रितू नंदा यांनी स्वतः राज कपूरविषयी काही लिहिण्याऐवजी राज कपूरची वक्तव्यं पुस्तकात सरळसरळ दिली आहेत. याव्यतिरिक्त राज कपूरचे निकटवर्तीय आणि फिल्म इंडस्ट्रीतील मान्यवरांनी राज कपूरबद्दल सांगितलेल्या गोष्टीही पुस्तकात आहेत.

प्रस्तुत आहे पुस्तकाची एक झलक... सुरुवात राज कपूरच्याच शब्दांनी...

'मी लहानपणी जाडा असल्याने सगळे माझी खूप थट्टा करायचे. त्यामुळे मी खूप दुःखी व्हायचो. शेवटी या दुःखातून बाहेर पडण्याचा रस्ता मी शोधला. मी माझ्या चेहऱ्यावर विदुषकाचा मुखवटा चढवला. म्हणजे मी असं दाखवायला लागलो की लोक माझ्याकडे पाहून हसतात हे मला आवडतं. नंतर मी एक पाऊल पुढे टाकलं. स्वतःच माझी थट्टा करून लोकांना हसवायला लागलो. कारण लहान वयाच्या इतर



पत्नी कृष्णासमवेत



राजन नंदा आणि रितू नंदाच्या विवाहप्रसंगी आनंदून गेलेले राज कपूर



(डावीकडून) ऋषीची कन्या रिद्धीमा आणि रणधीरच्या मुली करिना आणि करिश्मासह



मुलांप्रमाणे माझी इच्छा होती की लोकांनी माझ्यावर प्रेम करावं. मला दिलासा द्यावा, माझी स्तुती करावी.'

पहिली भूमिका कशी मिळाली याविषयी...

तेव्हा मी ज्युनियर मोस्ट असिस्टंट होतो. माझ्या लहान-मोठ्या अनेक कामातलं एक काम होतं क्लॅप देण्याचं. कॅमेरामनबरोबर माझं चांगलं पटायचं. प्रत्येक शॉटपूर्वी क्लॅप देतेवेळी माझा चेहरा एकदम क्लोजअपमध्ये कॅमेऱ्यात टिपण्याचं मी त्याला आधीच सांगून ठेवलं होतं. क्लॅप देतेवेळी मी केसांचा भांग नीट पाडून तयार व्हायचो. एकदा क्लॅप देतेवेळी माझा चेहरा नीट ठेवण्याच्या गडबडींत चुकून एका अभिनेत्याची दाढी क्लॅपर बोर्ड आणि पट्टीत अडकली. सगळं युनिट खो खो हसू लागलं, पण दिग्दर्शक केदार शर्मा यांनी माझ्या एक सणसणीत चढवली. मी चकित झालो. काही बोललो नाही. चूक माझी होती. पण त्यानेच मला चित्रपटात नायकाची भूमिका मिळाली. केदार शर्मा यांच्या म्हणण्याप्रमाणे (थप्पड मारल्यावर) 'या मुलाच्या डोळ्यातील वेदना आणि भाव यांनी मला प्रभावीत केलं.'

नरगिसविषयी...

नरगिस एक उदार मनाची स्त्री होती. कुठल्याही व्यक्तीची वेदना, व्यथा, बेचैनी तिला लगेच उमगत असे. आपल्या संपर्कात येणाऱ्यांमध्ये ती एक अध्यात्मिक शक्ती जागृत करत असे. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास जागृत होऊन कुठलंही काम करायला तयार होत.

नरगिस मला समजून घेत असे आणि मी तिला समजून घेत असे. खरं सांगू? तिच्याबद्दल माझ्या मनात असलेल्या भावना मला स्पष्ट शब्दांत सांगता येणार नाहीत. नाही... ते प्रेम नव्हतं. ती मला खूप आवडायची एवढं खरं. एका चांगल्या कलाकाराची दुसऱ्या चांगल्या कलाकाराबद्दल असते तशी भावना होती ती.

वृद्धापकाळात पत्नी कृष्णा यांच्याशी झालेलं बोलणं...

मी जेव्हा वळून बघतो तेव्हा मी तुला किती दुःख दिलं या विचाराने मी दुःखी होतो. तेव्हा मी जे गमावलं ते आता कसंही करून तुला देण्याची माझी इच्छा आहे. पण शो बिझनेसमध्ये असलेल्यांच्या बायकांना समजूतदारपणा दाखवावाच लागतो. कारण ही दुनियाच अशी आहे की, इथे अनेक स्त्रियांशी संबंधांची अनेक प्रकरणं घडत असतात.

राजच्या निकटवर्तीयांनी सांगितलेल्या काही गोष्टी...

पृथ्वीराज कपूरः राजू (राज कपूर) लहान होता तेव्हा त्याचे गाल कधी कधी इतके लाल व्हायचे की कधी कधी रामसरनी (राजची आई) ओले कपडे घेऊन गाल पुसायची. नंतर ते लाल डाग नसल्याचं तिच्या लक्षात यायचं. बऱ्याच वर्षांनी एकदा मी पत्नी आणि राजूबरोबर मॉस्कोला गेलो होतो. तिकडे मुलींनी राजूला घेरलं. माझ्या पत्नीने त्याला मुलींच्या तावडीतून सोडवून आणलं आणि त्याचे लिपस्टिकने लाल झालेले गाल पुसले.

कृष्णाः रितूचं लग्न होऊन ती दिल्लीला गेली तेव्हा आम्ही सगळेच कोलमडून गेलो होतो. राज मला एकदम स्वस्थ दिसत होते. रितू तिच्या नवऱ्याबरोबर निघाली तेव्हा राजजी कार घेऊन स्टुडियोतील आपल्या कॉटेजमध्ये गेले. तासाभरानंतर सहाय्यक त्यांच्या कॉटेजमध्ये गेला तेव्हा राजजी एकटेच रडत होते. खरं तर ते तसेच आहेत. कधी डब्बू (रणधीर) आणि चिंटू (ऋषी) रात्री पार्टीहून उशिरा यायचे तेव्हा राजजी त्यांची वाट पाहात बसलेले असायचे. पण दोघांना याचा पत्ताही ते लागू देत नसत. दुसऱ्या दिवशीही उशिरा आल्याबद्दल काही बोलत नसत. मला सांगत की, तू त्यांना काय ते सांग. घरातही आपण अप्रिय होऊ असं काही ते करत नसत.

रणधीरः एकदा मी आणि चिंटू पॅन्ट-कुर्ता परिधान करून बाहेर निघालो होतो. पिताजी आम्हाला ओरडले. 'विचित्र कपडे परिधान करून लोकांचं ध्यान आकर्षित करण्याचा प्रयत्न करू नका. तुमच्या कामामुळे लोकांचं लक्ष तुमच्याकडे वळेल असं काहीतरी करा.'

शशी कपूरः एकदा मी त्यांना म्हटलं की *आवारा*मध्ये जो अप्रतिम ड्रिम सिक्वेन्स (स्वप्नदृश्य) होतं ते पुन्हा करून दाखवा. त्यांनी शांतपणे उत्तर दिलं, 'मला एक नरगिस, एक शंकर-जयकिशन, शैलेन्द्र आणि मुकेश आणून दे, मी *आवारा*पेक्षाही चांगला सिक्वेन्स बनवून देईन.'

(१९९१ मध्ये मॉस्कोच्या इस्कुस्त्वो पब्लिशर्सद्वारा प्रकाशित झालेल्या पुस्तकाची ही नवी आवृत्ती पेंग्विन बुक्स इंडियाने प्रकाशित केलेली आहे. १९५ पानांच्या या सचित्र कॉफी टेबल बुकची किंमत आहे रु.७५०/-) ✫



हीरो म्हणून पहिली संधी देणाऱ्या केदार शर्मासह



नरगिस, राज आणि कृष्णाः प्रेमत्रिकोण(?)



हसरत जयपुरी, शंकर-जयकिशन आणि शैलेन्द्रसह राज कपूर